# ऋणनिर्देश

बाळशास्त्री जांभेकरांच्या `दर्पण` ह्या मराठी भाषेतील पहिल्याच वृत्तपत्राचा `सामाजिक व वाङ्‌मयीन अभ्यास` दोन वर्षांच्या अथक परिश्रमाने पूर्णत्वास आला याचे खूप समाधान वाटते. दीड पावणे दोन शतकापूर्वीच्या वृत्तपत्राचा अभ्यास करावा लागल्यामुळे दुर्मिळ ग्रंथ व नियतकालिके यांची अडचण भासली. मिळेल ती साधन सामुग्री उपलब्ध करून विस्तारानेच प्रबंधिकेचे कार्य केले आहे. माझ्या या कार्यास अनेकांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या ऋणांची परतफेड करणे शक्य नसले तरी मी त्यांचा इथे उल्लेख करणे गरजेचे समजतो.

प्रस्तुत प्रबंधिकेचे संशोधकमार्गदर्शक गुरुवर्य डॉ.ल.रा.नसिराबादकर यांचे मार्गदर्शन केवळ माझ्या ह्या अभ्यासापुरतेच मर्यादीत नसून ते मला भावी जीवनात यशोमंदीराकडे जाण्यास क्षणोक्षणी उपयुक्त ठरू शकेल. वडिलकीच्या भावनेतूनच त्यांनी मला मार्गदर्शन केले. त्यामुळे त्यांच्या ऋणात राहण्यातच मला आनंद वाटतो.

शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख डॉ.गो.मा.पवार, प्रा.रमेश ढावरे, प्रा.प्रभाकर पाटील यांचेही मला मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्याचप्रमाणे माझे एम्.फिल्. व पीएच्.डी.चे मित्र-मैत्रीणी यांच्याशी वेळोवेळी केलेली चर्चा मला अभ्यासात खूपच उपयुक्त ठरली.

माझ्या पूज्य मातोश्रीचे आशीर्वाद आणि श्रीयुत केरबा व श्रीयुत अरूण या दोन बंधूंची सततची प्रेरणा यामुळेच मी यशस्वी होऊ शकलो.

प्रबंधिकेचे टंकलेखन श्री रोकडे यांनी चांगल्या त-हेने करून दिले त्याबद्दल त्यांनाही धन्यवाद.

- प्रा.शिवाजीराव परशराम सोनाळकर.

मराठींतील पहिलें वृत्तपत्र 'दर्पण'


THE

BOMBAY DURPUN.

दर्पण

PROSPECTUS.

('दर्पण' पाक्षिकाच्या पहिल्या वर्षाचा पहिला अंक; ता. ६-१-१८३२)

निम्या पानांत इंग्रजी व निम्यांत मराठी असा मजकूर यांत छापला जात असे.

# अनुक्रमणिका


| | | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| प्रकरण पहिले | : | एकोणिसाव्या शतकातील सामाजिक जीवन आणि नियतकालिके. | १ – २२ |
| प्रकरण दुसरे | : | बाळशास्त्री जांभेकर : महाराष्ट्रातील आद्य विचारवंत व पत्रकार. | २३– २५ |
| प्रकरण तिसरे | : | `दर्पण` मधील लेखनाचा सामाजिक अभ्यास. | ५६– १३७ |
| प्रकरण चौथे | : | `दर्पण` मधील लेखनाचा वाङ्मयीन अभ्यास. | १३८– १६९ |
| प्रकरण पाचवे | : | उपसंहार. | १७०– १७६ |
| | : | संदर्भ ग्रंथ सूची. | १७७–१८२ |
| | : | संदर्भ नियतकालिकांची सूची. | १८३–१८५ |


----o----